| MHAU070022662025 | नि.दि.दावा क्रमांक ४६६/२०२५<br><br>निशाणी क्रमांक ३२ लगत<br>वादी तर्फे सा.क्र.१ |
|---|---|

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.वाय. आर. पल्लोड यांच्या मार्फत**

**१२.** मला मराठी लिहीता वाचता येते. मला इंग्रजी भाषा समजते. मला खरेदीखत, भाडेपटटे यांची माहीती आहे. मला दस्त नोंदणी निबंधक कार्यालयात करतात याबाबतची माहीती आहे. हे मला माहीती आहे की, एखादी मालमत्ता एकाच वेळी विक्री करता येते. मालमत्ता विकत घेतेवेळी कोणती कोणती माहीती घ्यावी लागते याची मला माहीती आहे.

**१३.** दावा मिळकत विकत घेतेवेळी आम्ही त्याची मोजणी करुन घेतली आहे. मोजणी नकाशा दाव्यात दाखल केला आहे किंवा काय हे मला आता सांगता येणार नाही. सदरचा नकाशा मी दाखल करु शकते. नकाशा प्रमाणे मिळकत माझया ताब्यात होती. साक्षीदार सांगते की, आज रोजी सुध्दा ताब्यात आहे. हे मला सांगता येत नाही की, ज्या खरेदीखताने मिळकत विकत घेतली ते खरेदीखत प्रकरणात दाखल केले आहे किंवा नाही. हे मला सांगता येणार नाही, प्रकरण व त्यामधील साक्षीपुरावा मी दाखल केला आहे का.

**१४.** दावा मिळकत विकत घेतल्यावर त्यामधील २२ x १४८ फुट क्षेत्रफळ मी विकलेले आहे. सदर जागा विक्री केल्याचे खरेदीखत मी प्रकरणात दाखल केले आहे किंवा काय हे सांगु शकत नाही. हे मला निश्चीत सांगता येणार नाही की, उर्वरीत २४ गुंठे क्षेत्र अनिल शिंदे नावाच्या व्यक्तीला

२०१८ साली भाडयाने दिलेले आहे. मी अनिल शींदे यांना २४ क्षेत्र गुंठयाबाबत कितीवेळा किती भाडेपटटे करुन दिले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ साली मी अनिल शिंदे यांना सन २०१८ ते २०३९ या २१ वर्षाच्या कालावधीकरीता जागा भाडेपटयाने दिलेली आहे. हे मला सांगता येणार नाही की, सन २०२० साली याच भाडेपटयाच्या अनुषंगाने दुरुसतीपत्र क्र.२२०३/२०२० नोंदवण्यात आला किंवा काय.

**१५.** हे मला सांगता येणार नाही की, याच २४ गुंठे मिळकतीकरीता दि.३०/०८/२०२१ रोजी मी अनिल शिंदे यांना नोंदणीकृत लिजडीड दि.०१/०८/२०२१ ते दि.०१/०८/२०४२ या कालावधीकरीता करुन दिलेले आहे. सदर दस्त मी प्रकरणात दासल केला असुन तो बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तांच्या आधारावर मिळकतीवर पेट्रोल पंप चालु केलेले आहे व त्याबाबत त्यांनी हिंदुस्तान पेट्रोलपंप या कंपनीशी करार केला व त्यास मी संमती दिलेली आहे. हे मला सांगता येत नाही की, सदर व्यवहारामध्ये मी माझया पतीच्या नावे मुखत्यारपत्र २२०४/२०२० नोंदणीकृत करुन दिलेले आहे.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/०७/२०२३ रोजी प्रतिवादी नावंदर यांनी आमचेविरुध्द त्यांचे मिळकतीचा आम्ही बेकायदेशीर ताबा घेत आहोत अशा आशयाचा अर्ज तहसीलदार गंगापूर यांच्याकडे केलेला होता. हे मला सांगता येणार नाही की, दि.०१/११/२०२३ रोजी मी अनिल शिंदे यांना भाडेपटटा दुरुस्तीपत्र नोंदणीकृत करुन दिलेले आहे. हे मला सांगता येणार नाही की, दाव्यामध्ये नमुद केलेल्या दावा मिळकत क्षेत्र ३०२.६०

चौ.मी. या जागेची मी मालक असल्याचे व त्याचा ताबा असल्याबाबतचे कागदपत्र प्रकरणात दाखल केले आहे किंवा नाही.

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.03.30 12:35:31 +0530

दिनांकः- ३०.०३.२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर